**महाराष्ट्र शासन**
**विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग**
**मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, नाशिक रोड - 422101**
**दुरध्वनी क्र. :** 0253-2461439 **Email : dycomplan.nashik@maharashtra.gov.in**
**विभागाचे नाव : नियोजन शाखा** **संकलन : कुंभमेळा**

प्रति,
मा. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,
जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती, नाशिक.

विषय:- सन 2027 मध्ये नाशिक येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळयाच्या तयारीच्या अनुषंगाने पूर्वचर्चा या विषयाबाबत मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक 17 जानेवारी 2025 रोजी आयोजीत बैठकीचे इतिवृत्त.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन दिनांक 17, जानेवारी 2025 रोजी सह्याद्री अतिथीगृह, मंत्रीमंडळ कक्ष, मुंबई येथे नाशिक येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळयाच्या तयारीच्या अनुषंगाने पूर्वचर्चा या विषयाबाबत मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

सदर बैठकीचे इतिवृत्त या कार्यालयास प्राप्त झालेले आहे. करिता सदरचे इतिवृत्त माहितीस्तव तथा पुढील उचित कार्यवाहीस्तव आपले कार्यालयास पाठविण्यात येत आहे. ही विनंती.

आपला विश्वासु,
**Signed by Yogendra Ashok Chaudhari**
**Date: 23-02-2025 20:33:13**

सोबत. बैठकीचे इतिवृत्त.

(योगेंद्र चौधरी)
उपआयुक्त (नियोजन)
नाशिक विभाग, नाशिक

**महाराष्ट्र शासन**

**नगर विकास विभाग**

४ था मजला, (मुख्य इमारत), मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय मुंबई-४०० ०३२

Email ID : **ud२५.urban-mh@mah.gov.in**

---

क्र. बैठक-२०२५/प्र.क्र. ०७ /नवि-२५ दिनांक : १७ फेब्रुवारी, २०२५

**प्रति,**

१) मा.उप मुख्यमंत्री महोदय (नगर विकास व सार्वजनिक बांधकाम विभाग)
२) मा.उप मुख्यमंत्री महोदय (वित्त व नियोजन)
३) मा.मंत्री महोदय (जलसंपदा,विदर्भ,तापी खोरे व कोकण पाटबंधारे विकास महामंडळ व आपत्ती व्यवस्थापन)
४) मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य.
५) अपर मुख्य सचिव,महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई
६) अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
७) अपर मुख्य सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
८) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
९) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
११) अपर मुख्य सचिव, परिवहन विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) अपर मुख्य सचिव, मदत व पुनर्वसन आणि आपत्ती व्यवस्थापन विभाग, मंत्रालय, मुंबई
१३) अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग(नवि-१), मंत्रालय, मुंबई
१४)अपर मुख्य सचिव, (सांस्कृतिक कार्य),पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,मंत्रालय,मुंबई
१५) प्रधान सचिव नगर विकास विभाग (नवि-२), मंत्रालय, मुंबई .
१६) प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१७) प्रधान सचिव (पर्यटन), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,मंत्रालय,मुंबई
१८) प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई
१९) सचिव,आरोग्य विभाग,मंत्रालय,मुंबई
२०) महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे, मुंबई,
२१) विभागीय आयुक्त, नाशिक विभाग,नाशिक
२२) जिल्हाधिकारी, नाशिक
२३) विशेष पोलीस महानिरीक्षक,नाशिक परिक्षेत्र
२४) पोलीस आयुक्त,नाशिक
२५) पोलीस अधिक्षक,नाशिक ग्रामीण.
२६)आयुक्त,नाशिक महानगरपालिका,नाशिक
२७)मुख्याधिकारी, त्र्यंबक नगरपरिषद, त्र्यंबकेश्वर.

**विषय :- सन २०२७ मध्ये नाशिक येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळयाच्या तयारीच्या अनुषंगाने पूर्वचर्चा या विषयाबाबत मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १७.०१.२०२५ रोजी आयोजित बैठकीचे इतिवृत्त.**

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन नाशिक येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळयाच्या तयारीच्या अनुषंगाने पूर्वचर्चा या विषयाबाबत मा.मुख्यमंत्री महादेय, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखालील दिनांक १७.०१.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता सह्याद्री अतिथीगृह, मंत्रीमंडळ कक्ष, मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या बैठकीचे इतिवृत्त आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे.

**आपला,**

17/02/2025

**(मो.क. बागवान)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

सोबत : वरीलप्रमाणे.

**प्रत : माहितीस्तव अग्रेषित -**

1) मा.मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांचे प्रशासकीय अधिकारी.

2) प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक.

3) उप सचिव (नवि-२५), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक

**दिनांक १७/०१/२०२५ रोजी दुपारी १२.०० वा. मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली सन २०२७ मध्ये नाशिक येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळयाच्या तयारीच्या अनुषंगाने पूर्वचर्चा या विषयाबाबत झालेल्या बैठकीचे इतिवृत्त**

---

सदर बैठकीला उपस्थित मान्यवरांची यादी सोबत जोडली आहे.

०२. दिनांक १७/०१/२०२५ रोजी मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली सहयाद्री अतिथी गृह, मुंबई येथे नाशिक- त्र्यंबकेश्वर कुंभमेळा २०२७ च्या पुर्वतयारी बाबत बैठक झाली. सदर बैठकीस मा.उपमुख्यमंत्री, [नगरविकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)], मा.मंत्री जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) व आपत्ती व्यवस्थापन, मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य व शासनातील इतर प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत विभागीय आयुक्त, नाशिक यांनी सादरीकरण करुन नाशिक- त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा २०२७ बद्दल प्रमुख माहिती, वाहतूक व्यवथा व गर्दीचे नियंत्रण, साधूग्राम, गोदावरी नदी व उपनद्या यांचे संवर्धन, शुध्दीकरण व सुशोभिकरण तसेच सांस्कृतिक परिसराचा विकास, कुंभमेळयाच्या इतर पायाभूत सुविधा आणि इतर अनुषंगिक विकासकामे याबद्दलचे सादरीकरणे केले. तसेच कुंभमेळयासाठी आत्तापर्यंत केलेल्या पुर्वतयारीबददल माहिती दिली. परिसरातील इतर प्रमुख विकास कामांबद्दल देखील चर्चा झाली. आयुक्त, मनपा, नाशिक यांनीही मनपाच्या कामांबद्दल सादरीकरण केले. त्याचप्रमाणे बैठकी दरम्यान जिल्हयातील इतर अधिकारी जसे की, जिल्हाधिकारी, नाशिक, पोलिस आयुक्त, नाशिक शहर, पोलिस अधीक्षक, नाशिक ग्रामीण, यांनीही प्रशासनाबद्दल व त्या त्या विभागाबद्दल सूचना केल्या.

बैठकीमध्ये मा.मुख्यमंत्री महोदय,महाराष्ट्र राज्य यांनी पुढीलप्रमाणे निर्देशित केले.

| अ.क्र. | मा. अध्यक्ष यांनी बैठकीत दिलेले निर्देश | संबंधित विभाग |
|---|---|---|
| अ. | **सर्वसाधारण सुचना** | |
| १ | नाशिक- त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा 2027 साठी आवश्यक असणा-या कामांची यादी, अंदाजित खर्च, त्यांचा प्राधान्यक्रम, इ. जिल्हास्तरीय कार्यकारी समिती आणि कुंभमेळा संबंधित इतर समित्यांनी तसेच संबंधित सचिवांनी जिल्हास्तरीय अधिका-यांच्या शिफारशीनुसार लवकरात लवकर तयार करावा. त्याकरिता मागील 2015 च्या सिंहस्थ कुंभमेळयात केलेले नियोजन तसेच सध्या प्रयागराज येथे सुरु असलेल्या महाकुंभमेळयाच्या आराखडयाचाही विचार व्हावा. प्रयागराज येथील नियोजनाचा अभ्यास करण्याकरिता मा. मंत्री जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) व आपत्ती व्यवस्थापन यांच्या नेतृत्वाखाली राज्य व जिल्हा स्तरावरील अधिका-यांचा चमू यांनी प्रयागराज येथे भेट देवून नियोजनाचा अभ्यास करावा. | सर्व संबंधित विभाग |
| २ | नाशिक व त्र्यंबकेश्वर शहरांतील नागरिक आणि इतर भागीदार, विविध संस्था, स्वयंसेवक, साधू- महंत नियोजनाच्या विविध घटकांमध्ये योग्य त्या टप्प्यांवर सहभाग करुन घ्यावा. | १. विभागीय आयुक्त,नाशिक<br>२. जिल्हाधिकारी, नाशिक<br>३.आयुक्त,नाशिक |

| | | |
|---|---|---|
| | | महानगरपालिका<br>४. नगर विकास विभाग (नवि-२) |
| ३ | सिंहस्थ कुंभमेळा 2027 चे नियोजन करीत असताना कुंभमेळा सुरु होण्यापुर्वी पुर्ण होवू शकणारी कामे व त्याकरिता लागणारा संभाव्य कालावधी याचा अंदाज घेवून त्यानुसार येत्या आणि यानंतरच्या अंदाजपत्रकात निधीची मागणी करावी. | १. विभागीय आयुक्त,नाशिक<br>२. जिल्हाधिकारी, नाशिक<br>३.आयुक्त,नाशिक महानगरपालिका<br>४. वित्त विभाग<br>५. मुख्याधिकारी, त्र्यंबक नगरपरिषद, त्र्यंबकेश्वर |
| ४ | विविध विकासकामांचे नियोजन करीत असताना अंदाजपत्रकीय तरतुदीशिवाय इतरही innovative financial models वापरता येईल काय याचा विचार करावा. उदा. साधुग्राम किंवा इतर जमिन भूसंपादनासाठी निधी देवून भूसंपादन करण्याच्या पर्यायाशिवाय हस्तांतरणीय विकास हक्क (टीडीआर) याचा नाविन्यपुर्ण वापर करुन किंवा अशा इतर पर्यायाव्दारे लवकरात लवकर जमिन अधिग्रहीत करता येईल काय याचा विचार करावा, सिवेज ट्रीटमेंट प्लँट (सांडपाणी व्यवस्थापन संयंत्र) चे नागपूर व इतर शहरामध्ये बांधकामे करताना कोणत्या वित्तीय मॉडेलचा वापर करण्यात आला किंवा अहमदाबाद येथे रिंगरोड बांधकाम करताना वापरण्यात आलेले वित्तीय मॉडेल अशा वेगवेगळया वित्तीय मॉडेलचा विचार करण्यात यावा. याशिवाय सीएसआर (कार्पोरेट सोशल रिस्पॉन्सीबीलीटी) त्याचाही योग्य तो वापर कामासाठी करावा. | १. विभागीय आयुक्त,नाशिक<br>२. जिल्हाधिकारी, नाशिक<br>३.आयुक्त,नाशिक महानगरपालिका |
| ५ | २०१५ च्या कुंभमेळयात उभारलेली आणि २०२७ मध्ये उभारण्यात येणारी बांधकामे (उदा. घाट, इ.) चा वापर केवळ कुंभमेळयाकरिता न करता उर्वरित कालावधीत देखील त्याचा अधिकाअधिक सुयोग्य वापर होईल, त्याचा स्थानिक नागरिक, पर्यटक, भाविक यांना फायदा होईल, त्यातून शासनाला उत्पन्न मिळेल आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल असे नियोजन करावे. | १. विभागीय आयुक्त,नाशिक<br>२. जिल्हाधिकारी, नाशिक<br>३.आयुक्त,नाशिक महानगरपालिका |
| ६ | सर्व विभागांनी याकामी लागणारे आवश्यक मनुष्यबळाचा अंदाज घेवून ते प्राप्त करुन घेण्यासाठी नियोजन करावे. नाशिक महानगरपालिकेच्या अधिक आस्थापना खर्चामुळे थांबलेल्या अभियंते व इतर संवर्गातील भरतीसाठी विशेष बाब म्हणून प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करावा. | नगर विकास विभाग - (नवि-२) |
| ७ | सर्व कामे आणि सुविधा यांचा दर्जा अत्युच्च राहिल याची काटेकोर दक्षता घ्यावी. गुणवत्तेबाबत आणि कामाच्या वेगाबाबत कोणत्याही प्रकारची तडजोड करु नये. याकरिता आवश्यक त्या तरतूदी निविदेत समाविष्ट कराव्यात जेणेकरुन हे साध्य होईल. | १. विभागीय आयुक्त,नाशिक<br>२. जिल्हाधिकारी, नाशिक<br>३.आयुक्त,नाशिक महानगरपालिका |

| | | |
|---|---|---|
| ८ | कुंभमेळयाचे नियोजन करण्यासाठी कुंभमेळा कक्षाची स्थापना करण्याचा प्रस्ताव सादर करावा. त्याकरिता आवश्यक त्या विभागातील उत्कृष्ट काम करणारे अधिका-यांचा शोध घेवून त्यांची नेमणूक या कक्षात करावी. | विभागीय आयुक्त,नाशिक |
| ९ | नियोजनात आणि प्रबंधनात AI आणि इतर प्रगत तंत्रज्ञाचा वापर करावा. महाराष्ट्र शासनाचा याबाबत काही मोठया कंपन्यांशी करारनामा (MoU) झालेला आहे. त्यांच्याकडूनही सेवा उपलब्ध करुन घेता येईल काय याची चाचपणी करुन त्याप्रमाणे कार्यवाही करावी. | १. माहिती व तंत्रज्ञान विभाग<br>२. विभागीय आयुक्त,नाशिक |
| **ब.** | **साधूग्राम व धार्मिक नगरी** | |
| १ | नाशिक येथील साधूग्राम बाबत मालकी हक्काची खात्री करुन भूसंपादन किंवा जमिन अधिग्रहण करावे. त्यासाठी नेहमीच्या कार्यपध्दती शिवाय विविध पर्यायांचा विचार करावा. उदा. हस्तांतरणीय विकास हक्क याचा इनोवेटीव्ह वापर करुन महानगरपालिकेने सदर जमिन अधिग्रहीत करता येईल काय याचा विचार करावा. | १. नगर विकास विभाग -(नवि-१)<br>२. आयुक्त,नाशिक महानगरपालिका<br>३. जिल्हाधिकारी, नाशिक |
| २ | सदर जमिनीचा वापर कुंभमेळा सोडून इतर कालावधीमध्ये विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम, व्यावसायिक क्रियाकलाप, इत्यादी साठी करण्याचे नियोजन करावे. | १. विभागीय आयुक्त,नाशिक<br>२. जिल्हाधिकारी, नाशिक<br>३.आयुक्त,नाशिक महानगरपालिका |
| ३ | त्याठिकाणी असलेल्या झाडांचे जास्तीत जास्त संवर्धन करुन केवळ अपरिहार्य कारणास्तवच त्यांना नियमानुसार काढण्याचा विचार करावा. त्याचप्रमाणे त्र्यंबकेश्वर येथील साधूग्रामचे देखील नियोजन करावे. | १. वन विभाग<br>२. आयुक्त,नाशिक महानगरपालिका |
| ४ | याशिवाय नाशिक शहराजवळ/ परिसरात कायमस्वरुपी टेम्पल/रिलीजीयस कन्व्हेशन सेंटर (धार्मिक नगरी) उभारण्याचे नियोजन करावे. याठिकाणी सर्वच राज्यातील/ भागातील धार्मिक माहितींचे कायमस्वरुपी प्रदर्शनी उभारावी. तसचे वेळोवेळी याठिकाणी मोठे कन्व्हेंशन करावे. याठिकाणी एक टेंट सिटी देखील करता येईल. पर्यटकांना व भाविकांना येथे अध्यात्मिक अनुभव कायमस्वरुपी प्राप्त होईल अशा सुविधा येथे उभाराव्यात. या कन्व्हेंशन सेंटरचा कुंभमेळयात देखील भाविकांसाठी व साधुमहंतांसाठी वापर करता येईल. | १. पर्यटन विभाग<br>२. विभागीय आयुक्त,नाशिक<br>३. जिल्हाधिकारी, नाशिक<br>४. आयुक्त,नाशिक महानगरपालिका |
| **क.** | **धार्मिक (religious) कॉरिडॉर** | |
| १ | काशी विश्वनाथ किंवा उज्जैनच्या धर्तीवर नाशिक येथे रामकुंड, काळराम मंदिर, गोदावरी नदीकाठ तसेच त्र्यंबकेश्वर येथे शहरातील प्रवेशापासून त्र्यंबकेश्वर मंदिर आणि कुशावर्त परिसरामध्ये धार्मिक कॉरिडॉर उभारावा. याकरिता ढोबळ मानाने आराखडे तयार असून त्यासाठी नाशिक येथे | १. पर्यटन विभाग<br>२. विभागीय आयुक्त,नाशिक<br>३. आयुक्त,नाशिक |

| | | |
|---|---|---|
| | रामकालपथ प्रकल्पांगर्तत रुपये 99 कोटी केंद्र शासनाकडून प्राप्त झाले आहेत. याशिवाय उर्वरित आराखडयासाठी आवश्यक निधीची सविस्तर आराखडे तयार करुन आवश्यक निधीची मागणी पर्यटन विभाग व इतर विभागाच्या योजने अंतर्गत व तसेच सीएसआर अंतर्गत करावी आणि लवकरात लवकर नियोजन करुन काम पुर्ण करावे. | महानगरपालिका<br>४. जिल्हाधिकारी, नाशिक |
| २ | या कॉरिडॉर्समध्ये अत्युच्च धार्मिक आणि सांस्कृतिक अनुभूती देणारा अनुभव मिळण्यासाठी उत्कृष्ट दर्जाच्या कलाकृती (कमानी, पुतळे, इ.) तसेच मंदिरांचे सुशोभिकरण व आवश्यकतेनुसार पादचारीकरण, लाईट अॅण्ड साऊंड शो व इतर सुविधा द्याव्यात. तसेच जवळपास वाहनतळांची निर्मिती करावी. तथापि अपंग, वयोवृध्द इत्यांदीना अडचण होवू नये म्हणून त्यांच्यासाठी इलेक्ट्रीक व्हेईकल, गोल्फ कार्ट, इ. प्रकारची सुविधा उपलब्ध करुन द्यावी. | १. पर्यटन विभाग<br>२. विभागीय आयुक्त,नाशिक<br>३. आयुक्त,नाशिक महानगरपालिका<br>४. जिल्हाधिकारी, नाशिक |
| ३ | या परिसरातील गर्दी व विशेषत: सिंहस्थ कुंभमेळयातील गर्दी लक्षात घेता अडथळे निर्माण होतील अशा स्वरुपाची बांधकामे, अतिक्रमणे व इतर स्ट्रक्चर्स याचा अभ्यास करुन परिसर मोकळा करावा जेणेकरुन आपत्ती उद्रभवण्याची शक्यता कमीत कमी होईल. तसेच परिसरातील सौंदर्यवृध्दी करण्यासाठी आवश्यक बांधकामे करुन आणि अनावश्यक बांधकामे काढून त्या परिसराला सुसंगत असे सुशोभिकरण करावे. या करीता आवश्यकता वाटल्यास त्र्यंबकेश्वर येथील शासकीय कार्यालये देखील इतरत्र हलवावीत. | १. विभागीय आयुक्त,नाशिक<br>२. जिल्हाधिकारी, नाशिक<br>३.आयुक्त,नाशिक महानगरपालिका |
| ४ | गोदावरी नदीवर इतरत्र बांधलेल्या घाटांचा पुर्णवेळ वापर करण्यासाठी त्याठिकाणी आरती, लाइट अॅण्ड साऊंड शो, इतर धार्मिक/ सांस्कृतिक कार्यक्रम व नागरिकांसाठी इतर उपक्रम कसे करता येईल याचेही नियोजन करावे. | आयुक्त,नाशिक महानगरपालिका |
| ५ | या ठिकाणी तसेच दोन्ही शहरात आवश्यक त्या ठिकाणी स्थानिकरित्या तयार होणा-या वस्तू, जीआय टॅग प्रॉडक्टस व इतर स्थानिक बाबींचे विक्रीसाठी आवश्यक त्या सुविधा उपलबध करुन द्याव्यात जेणेकरुन स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल. | १. विभागीय आयुक्त,नाशिक<br>२. जिल्हाधिकारी, नाशिक<br>३.आयुक्त,नाशिक महानगरपालिका |
| ६ | नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथील मंदिर संस्थाने यांचा सहभाग व्यवस्थापन प्रक्रियेत राहील याची दक्षता घ्यावी. त्यांच्या निधीचा देखील नियोजन करुन वापर करावा. | विधी व न्याय |
| ड. | **गोदावरी नदीच्या संवर्धन, शुध्दीकरण, सुशोभिकरण** | |
| १ | नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे प्रक्रिया न केलेले सांडपाणी आणि मलजल कुंभमेळयाच्या वेळी नदीत जाणार नाही याची पुर्ण दक्षता घ्यावी. त्यासाठी कायमस्वरुपी उपाययोजना वेळेत करणे शक्य नसल्यास इतर उपाययोजना जसे की, इंटरसेप्शन अॅण्ड ड्रेनेज (प्रतिच्छेदन आणि निचरा) याचे नियोजन करुन त्याकामाची सुरुवात यथाशिघ्र करावी. | १. पर्यावरण विभाग<br>२. आयुक्त,नाशिक महानगरपालिका |
| २ | शहरात कुंभमेळयाच्या निमित्ताने किती अतिरिक्त मलजल, सांडपाणी | आयुक्त,नाशिक |

| | | |
|---|---|---|
| | तयार होणार आहे याचा अंदाज घेवून त्याचे नियोजन करुन कुंभमेळयाच्या आराखडयात टाकावे. | महानगरपालिका |
| ३ | शहरातील सांडपाणी आणि मलजल बद्दलचा बृहत आराखडा केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनांमधून योग्य त्या अभिसरणामधून तयार करावा. | आयुक्त,नाशिक महानगरपालिका |
| ४ | नमामि गंगेची मुळ संकल्पना, नागपूर येथील सांडपाणी/ मलजल शुध्दीकरण आणि अशा अनेक प्रकल्पांमध्ये financing आणि outcome बाबत अनेक नाविन्यपूर्ण बाबी आहेत. उदा. नदीत अंतिमत: डिस्चार्ज होणा-या आणि नदीतील पाण्याच्या एका विशिष्ट स्टेज मधील पाण्याच्या क्वालिटी (दर्जा) याचा आउटकम निश्चित करुन त्यानुसार निविदा करणे, प्रक्रीया केलेले पाणी विद्युत निर्मिती करणा-या संस्थांना विकणे, इ. अशा सर्व प्रकल्पांचा अभ्यास करावा आणि त्यातील लागू बाबी नाशिक येथील प्रकल्पांमध्ये अंतर्भूत कराव्यात जेणेकरुन प्रकल्प पयार्वरण आणि वित्तीय दृष्टया शाश्वत राहतील. | १. विभागीय आयुक्त,नाशिक<br>२. जिल्हाधिकारी, नाशिक<br>३.आयुक्त,नाशिक महानगरपालिका |
| ५ | जायका किंवा तत्सम यंत्रणांकडून निधी उपलब्ध करुन घेण्यास हरकत नाही. तथापि या प्रकियेसाठी लागणारा कालावधी याचाही विचार करुन त्यानुसार नियोजन करावे. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियामक मंडळ यांच्या निधीचा वापर करण्याचे नियोजन करावे. एमआयडीसीने विविध उद्योगातून नदीला होणारे प्रदूषण याबददलचे इटीपी किंवा तत्सम यंत्रणा उभारण्याचे नियोजन करावे. | १. पर्यावरण विभाग<br>२. उद्योग विभाग<br>३. विभागीय आयुक्त,नाशिक<br>४. जिल्हाधिकारी, नाशिक<br>५.आयुक्त,नाशिक महानगरपालिका |
| ६ | गोदावरी नदीतील जलपर्णीवर कायमस्वरुपी उपाय शोधावा. यासाठी उल्हास नदीचे उदाहरण देण्यात आले. | आयुक्त,नाशिक महानगरपालिका |
| **इ.** | **स्वच्छता (सॅनिटेशन)** | |
| १ | सर्व भाविक, साधूमहतांना शुध्द पाण्याचा पुरवठा होईल याचे नियोजन करावे. | १. पाणीपुरवठा विभाग<br>२.आयुक्त,नाशिक महानगरपालिका |
| २ | कुंभमेळयाच्या दरम्यान मोठया प्रमाणावर विविध संस्थांकडून अन्नदान केले जाते. त्याचे योग्य ते नियोजन करावे. विशेषत: त्यातून निर्माण होणा-या घनकच-याची योग्य विल्हेवाट लावावी. | आयुक्त,नाशिक महानगरपालिका |
| ३ | नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे पुरेशा प्रमाणात मोबाईल किंवा तत्सम स्वरुपाचे टॉयलेटसची व्यवस्था असावी आणि याठिकाणी पुरेसे मनुष्यबळ, पाणी व इतर सुविधा यांचे काटेकोरपणे नियोजन करावे. | आयुक्त,नाशिक महानगरपालिका |
| ४ | कुंभमेळा कालावधीमध्ये दोन्ही शहरात आणि परिसरात निर्माण होणा-या घनकच-याचे उत्कृष्ट नियोजन आत्तापासून करावे. त्याकरिता आवश्यक मनुष्यबळ आणि घनकचरा वाहतूक आणि प्रक्रिया याचे नियोजन करावे. मनुष्यबळाच्या उपस्थितीसाठी मागील कुंभमेळयात एक ॲप तयार करण्यात आले होते. त्यापेक्षाही चांगले ॲप यावेळेस तयार करुन घनकचरा व्यवस्थापनेचे प्रबंधन करावे. | आयुक्त,नाशिक महानगरपालिका |

| ई. | रस्ते आणि दळणवळण | |
|---|---|---|
| १ | नाशिक शहरासाठी रिंगरोडचे नियोजन करावे. त्याकरिता अहमदाबाद येथे रिंगरोड तयार करताना वापरलेल्या मॉडेलचा अभ्यास करुन त्याचा विचार करावा. | १. नगर विकास विभाग -(नवि-१)<br>२. सार्वजनिक बांधकाम विभाग<br>३. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ |
| २ | नाशिक शहराला जवळची सर्व विमानतळे (नाशिक, शिर्डी, छत्रपती संभाजीनगर आणि मुंबई) येथे जोडण्यासाठी उच्च दर्जाचे रस्ते असावेत. | १. सार्वजनिक बांधकाम विभाग<br>२. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ<br>३.आयुक्त,नाशिक महानगरपालिका |
| ३ | नाशिक व परिसरातील अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी शहराला प्रस्तावित वाढवण बंदराशी जोडणारा महामार्ग तयार करावा. | १. सार्वजनिक बांधकाम विभाग<br>२. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ |
| ४ | त्र्यंबकेश्वरला मुंबई - नाशिक महामार्गाशी जोडणारा रस्ता रुंदीकरण किंवा चौपदरीकरण करावा. | १. सार्वजनिक बांधकाम विभाग<br>२. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ |
| ५ | याशिवाय कुंभमेळा नियोजनासाठी आवश्यक असणारे रस्ते तयार करावेत. | १. सार्वजनिक बांधकाम विभाग<br>२. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ<br>३.आयुक्त,नाशिक महानगरपालिका |
| ६ | नाशिक आणि त्र्यंबकेश्वर परिसरात कुंभमेळयात येणा-या भाविकांच्या तसेच अतिमहत्वाच्या व्यक्तींच्या येण्या जाण्यासाठी आणि तसेच वैद्यकीय आपत्कालीन व्यवस्थेसाठी एअर ॲम्ब्यूलन्स म्हणून आवश्यक तितक्या प्रमाणात हेलिपॅडस उभारावेत. त्याचा कायमस्वरुपी वापर होईल याचेही नियोजन करावे. | सार्वजनिक बांधकाम विभाग |
| उ. | आपत्ती व्यवस्थापन | |
| १ | गर्दीचे नियोजन वाहतूक संनियंत्रण इ. सर्व कार्यवाही करताना कोणत्याही प्रकारे आपत्ती होणार नाही याची दक्षता घ्यावी. त्याकरिता नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा व विशेषत: अग्नीशमन विभाग तसेच पोलीस आणि वैद्यकीय सुविधा यांचे बळकटीकरण करावे व तसचे | १.आपत्ती व्यवस्थापन<br>२. गृह विभाग<br>३. सार्वजनिक आरोग्य विभाग |

| | | |
|---|---|---|
| | जिल्हा प्रशासन, अग्नीशमन विभाग आणि पोलीस विभागाने योग्य ते नियोजन करावे. | ४.आयुक्त,नाशिक महानगरपालिका |
| २ | दोन्ही शहरात सीसीटीव्ही कॅमेरे कुंभमेळयापूर्वी कायमस्वरुपी लागतील याची दक्षता घ्यावी. शहरात रस्ते आणि गर्दीच्या ठिकाणी शिवाय एंट्री/ एक्झीट पॉइंटस (उदा. रेल्वे स्टेशन, बस स्थानके) व त्याच प्रमाणे गर्दीची इतर जागा (साधुग्राम) या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावावेत. याशिवाय ड्रोन कॅमे-याचा देखील वापर करावा. साधूग्रम येथील सीसीटीव्ही कॅमेरे कुंभमेळा नसताना इतर ठिकाणी लावता येतील. या सीसीटीव्ही कॅमे-याच्या व्हिडीओचा प्रभावी वापर होण्यासाठी योग्य त्या सॉफ्टवेअरचा वापर करावा. | १. गृह विभाग<br>२. जिल्हाधिकारी, नाशिक<br>३.आयुक्त,नाशिक महानगरपालिका |
| ३ | शहरात विविध ठिकाणी मोठे स्क्रीन्स लावावे ज्याचा वापर सूचना प्रसारित करण्यासाठी व त्याचवेळी जाहिरातीव्दारे उत्पन्नासाठी करता येईल. | १. विभागीय आयुक्त,नाशिक<br>२. जिल्हाधिकारी, नाशिक<br>३.आयुक्त,नाशिक महानगरपालिका |
| ४ | दोन्ही शहरात गर्दी नियोजनासाठी पब्लिक ॲड्रेस सिस्टीम लावावी. | १. गृह विभाग<br>२. विभागीय आयुक्त,नाशिक<br>३. जिल्हाधिकारी, नाशिक<br>४. आयुक्त,नाशिक महानगरपालिका |

क्षेत्रीय पातळीवर वरील निर्देशांची अंमलबजावणी विभागीय आयुक्त, नाशिक यांनी आणि संबंधित सचिवांनी संबंधित विभागांकडून करुन घ्यावी.

याबाबतची पुढील बैठक मा. मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखाली १५ फेब्रुवारी २०२५ किंवा त्या दरम्यान करण्यात येईल.

वरील प्रमाणे चर्चा होऊन व निर्णय होऊन बैठक समाप्त झाली

**************************************************

मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली सहयाद्री अतिथी गृह, मुंबई येथे नाशिक- त्र्यंबकेश्वर कुंभमेळा २०२७ च्या पुर्वतयारीबाबत बैठक दिनांक १७/०१/२०२५

विभागीय आयुक्त, नाशिक यांनी केलेले सादरीकरण जोडले आहे. तसेच बैठकीमध्ये इतर विभागांनी केलेल्या अतिरिक्त मागण्या खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | इतर विभागांच्या मागण्या |
|---|---|
| | **नाशिक महानगरपालिका** |
| १ | मखमलाबाद व कामटवाडा येथे नवीन मलशुद्धीकरण केंद्रास मंजुरी देण्यात यावी |
| २ | मल अडविणे आणि वळविणे यांत्रिकी आणि विद्युत सह प्रकल्प तयार करणे |
| ३ | तपोवन, आगर टाकळी, पंचक आणि चेहेडी येथे मलशुद्धीकरण केंद्राचा पुनर्रविकास करणे |
| ४ | मखमलाबाद व कामटवाडा येथील मल:निस्सारण केंद्राकरिता व इतर ठिकाणी सिवरेज नेटवर्क विकसित करणे |
| | **गृह विभाग** |
| १ | कुंभमेळा कालावधीसाठी नाशिक ग्रामीण पोलिसांना पोलीस छावणी आणि बंदोबस्ताच्या मुख्यालयासाठी सुमारे १० एकर जमीन देण्यात यावी |
| २ | रस्ते अपघात कमी करण्यासाठी आणि आपत्कालीन परिस्थितींमध्ये जलद प्रतिसाद देण्यासाठी 'वाहतूक पोलीस योजना (TPS)' तयार करणे |
| ३ | त्र्यंबकेश्वर शहराच्या बाहेर नवीन पोलीस ठाण्यासाठी इमारत बांधकाम |
| ४ | नाशिक शहरातील सीसीटीव्ही कॅमेराच्या प्रणालीमध्ये एंट्री / एक्झीट पॉइंटस उदा. रेल्वे स्टेशन येथील सीसीटीव्ही कॅमेराचा समावेश करावा. |
| | **सार्वजनिक बांधकाम विभाग** |
| १ | पर्यटक व भाविकांच्या सोयीसाठी नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे हेलीपॅड तयार करण्यात यावेत. |

3e



सन २०२७-२८ या वर्षात नाशिक येथे आयोजित सिंहस्थ कुंभमेळयाच्या संदर्भात मा.मुख्यमंत्री महोदय,महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १७/०१/२०२५ रोजीच्या बैठकीस उपस्थित असलेले अधिकारी/पदाधिकारी यांची यादी.

| अ.क्र. | नाव | पदनाम | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | मनोजकुमार सूर्यवंशी | MD, MTDC | [signature] |
| ३ | डॉ संजय [illegible] | सचिव, जलसंपदा | [signature] |
| ४ | Virendra Singh | सचिव (२) सार्वजनिक आरोग्य विभाग | [signature] |
| ५ | A S Ranga Naik | आयुक्त, आरोग्य सेवा | [signature] |
| ६ | डॉ. माधव कुसेकर | VCMD, MSRTC | [signature] |
| ७ | अतुल पाटणे | सचिव पर्यटन | [signature] |
| ८ | Chandrakant Khandvi | DCP (HQ) Nashik | [signature] |
| ९ | S.N.Shaikh | SPCR Dep office | [signature] |
| १० | Aniket Kulkarni | NMC Nashik | [signature] |
| ११ | Swapnil Kakad | नगर अभियंता त्रिंबक नगरपरिषद | [signature] |
| १२ | Purva Mali | WS Engg Trimbak M.C. | [signature] |
| १३ | J. J. Singh | Consultant Trimbak | [signature] |
| १४ | | | |
| १५ | | | |
| १६ | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |
| १७ | | | |
| १८ | | | |
| १९ | | | |
| २० | | | |
| २१ | | | |
| २२ | | | |
| २३ | | | |
| २४ | | | |
| २५ | | | |
| २६ | | | |
| २७ | | | |
| २८ | | | |
| २९ | | | |
| ३० | | | |
| ३१ | | | |
| ३२ | | | |
| ३३ | | | |
| ३४ | | | |

नगर विकास विभाग/नवि-२५

सन २०२७-२८ या वर्षात नाशिक येथे आयोजित सिंहस्थ कुंभमेळयाच्या संदर्भात मा.मुख्यमंत्री महोदय,महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १७/०१/२०२५ रोजीच्या बैठकीस उपस्थित असलेले अधिकारी/पदाधिकारी यांची यादी.

| अ.क्र. | नाव | पदनाम | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| १ | डॉ. शिवराम मानसपुरे | Dy. Chief operation manager, Central Railway | [signature] |
| २ | राजकुमार वानखेडे 8828110203 | Chief Planning & Design Engineer, Central Railway | [signature] |
| ३ | सुमंत देऊळकर | मुख्य वाणिज्य प्रबंधक (मालभाडा) मध्य रेल्वे, मुंबई. | [signature] |
| ४ | डॉ. श्रीया देवचके | त्रिंबक नगरपरिषद मुख्याधिकारी | [signature] |
| ५ | डॉ. माणिक गुरसळ | आयुक्त, NMRDA | [signature] |
| ६ | Sandeep Karnik C.P. Nashik | Nashik City Police C.P. Nashik. | [signature] |
| ७ | Datta R. Karale Spl I.G.P. Nashik | IGP, Nashik Range. | [signature] 17.1 |
| ८ | जलज शर्मा | जिल्हाधिकारी, नाशिक | [signature] |
| ९ | Manisha Khatri NMC | NMC Commissioner | [signature] |
| १० | Praveen Gedam | Div Com Nashik | [signature] |
| ११ | Mrs. Keole | Land J | [signature] |
| १२ | Dr. K.H. Govinda Raj | PS UD-2 | [signature] |
| १३ | N. NAWIN SONA | Pr. Secy to Hon. DCM | [signature] |
| १४ | | | |
| १५ | | | |
| १६ | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |
| १७ | | | |
| १८ | | | |
| १९ | | | |
| २० | | | |
| २१ | | | |
| २२ | | | |
| २३ | | | |
| २४ | | | |
| २५ | | | |
| २६ | | | |
| २७ | | | |
| २८ | | | |
| २९ | | | |
| ३० | | | |
| ३१ | | | |
| ३२ | | | |
| ३३ | | | |
| ३४ | | | |

सन २०२७-२८ या वर्षात नाशिक येथे आयोजित सिंहस्थ कुंभमेळयाच्या संदर्भात मा.मुख्यमंत्री महोदय,महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १७/०१/२०२५ रोजीच्या बैठकीस उपस्थित असलेले अधिकारी/पदाधिकारी यांची यादी.

| अ.क्र. | नाव | पदनाम | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| १ | Sujata Saunik | CS Maharashtra | [signature] |
| २ | O. P. GUPTA | ACS (fin) | [signature] |
| ३ | Manisha Mhaiskar | ACS PWD | [signature] |
| ४ | Rajagopal. D | ACS (P) | [signature] |
| ५ | जयश्री भोज | Pr. Secy Tourism | [signature] |
| ६ | डॉ. माधव कुसेकर | VCMD, MSRTC | [signature] |
| ७ | Virendra Singh | Secretary (PHD) | [signature] |
| ८ | A S Ranga Naik. | Commissioner, Health Services. MH | [signature] |
| ९ | Dr Sanjay Belsare | Secretary (WRD) | [signature] |
| १० | Satishkumar Khadake | Director (Disaster Management) | [signature] |
| ११ | | | |
| १२ | | | |
| १३ | | | |
| १४ | | | |
| १५ | | | |
| १६ | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |
| १७ | | | |
| १८ | | | |
| १९ | | | |
| २० | | | |
| २१ | | | |
| २२ | | | |
| २३ | | | |
| २४ | | | |
| २५ | | | |
| २६ | | | |
| २७ | | | |
| २८ | | | |
| २९ | | | |
| ३० | | | |
| ३१ | | | |
| ३२ | | | |
| ३३ | | | |
| ३४ | | | |

सन २०२७-२८ या वर्षात नाशिक येथे आयोजित सिंहस्थ कुंभमेळयाच्या संदर्भात मा.मुख्यमंत्री महोदय,महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १७/०१/२०२५ रोजीच्या बैठकीस उपस्थित असलेले अधिकारी/पदाधिकारी यांची यादी.

| अ.क्र. | नाव | पदनाम | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | इ. सिंग चहल | अमुस (गृह) | |
| ४ | असीम गुप्ता | अ.मु.स. (UD-1) | |
| ५ | | | |
| ६ | | | |
| ७ | | | |
| ८ | | | |
| ९ | | | |
| १० | | | |
| ११ | | | |
| १२ | | | |
| १३ | | | |
| १४ | | | |
| १५ | | | |
| १६ | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |
| १७ | | | |
| १८ | | | |
| १९ | | | |
| २० | | | |
| २१ | | | |
| २२ | | | |
| २३ | | | |
| २४ | | | |
| २५ | | | |
| २६ | | | |
| २७ | | | |
| २८ | | | |
| २९ | | | |
| ३० | | | |
| ३१ | | | |
| ३२ | | | |
| ३३ | | | |
| ३४ | | | |